दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Agro. Tourism & Adventure Park

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १८० • RNI : MAHMAR/2023/87818 • सोमवार, दि.५ मे २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# पाय तोडायचे अन् पळ म्हणायचे:मग माझ्या खात्याचा नंबर कसा येणार?

## निधी वळवण्यावरून संजय शिरसाटांचा सरकारला सवाल

छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेअंतर्गत मूल्यमापनाचा निकाल जाहीर केला आहे. त्यात महिला व बाल विकासमंत्री आदिती तटकरे यांचा पहिला क्रमांक आला आहे. यावरून शिंदे गटाचे नेते आणि सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी आपल्याच सरकारवर हल्लाबोल केला. पाय तोडायचे अन् पळ म्हणायचे, मग माझ्या खात्याचा नंबर कसा येणार? असा सवाल शिरसाट यांनी निधी वळवण्यावरून सरकारला केला आहे.लाडकी बहीण योजनेसाठी सामाजिक न्याय विभागाचा सव्वाचारशे कोटी रुपयांचा निधी वळवण्यात आल्यामुळे संजय शिरसाट यांनी नाराजी व्यक्त केली होती. सामाजिक न्याय खात्याची गरज नसेल त्या खात्यात पैसे खर्च करायचे नसतील तर खाते बंद केली तरी चालेल, अशी उद्विग्न प्रतिक्रिया संजय शिरसाट यांनी दिली होती. आज त्यांनी पुन्हा एकदा मंत्र्यांच्या रिपोर्ट कार्डवरून सरकारवर टीका केली आहे.



### एकनाथ शिंदेंना भेटून आपबीती सांगणार

खात्याकडे निधी नसेल तर आम्ही नेमके काय काम करत आहे, हे जनतेला कसे कळणार? सरकारला कसे कळणार? असा सवालही शिरसाट यांनी केला. समाज कल्याण विभाग हे गोरगरीब जनतेला न्याय देणारे विभाग आहे. अजित पवार यांच्याकडे अर्थ खाते आहे. त्यांनी मोठ्या मनाने या विभागाला जास्तीत जास्त निधी द्यायला हवा. या खात्याचा निधी इतरत्र वर्ग करायला नको. मी याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी बोललो आहे. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटून मी सगळे आपबीती सांगणार असल्याचे संजय शिरसाट यांनी सांगितले.

आदिती तटकरे यांच्या खात्यात आमच्या खात्याचा निधी वर्ग केला. त्यामुळे लाडक्या बहिणींना पैसे गेले. त्यानंतर त्यांचा विभाग नंबर एक वर आला. या कामगिरीत आमचा कुठेही उल्लेख नाही. कारण आम्हाला काम करण्याची संधी मिळाली नाही. मग आमचा उल्लेख १०० दिवसांच्या उपक्रमामध्ये कसा होणार? त्यामुळे हे खातेच बंद करून टाका, हे चांगले आहे, असा टोला शिरसाट यांनी लगावला. एकीकडे माझे पाय तोडायचे आणि दुसरीकडे मला म्हणायचे की, पळतर हे शक्य होणार नाही. हा माझ्यावर होत असलेला अन्याय आहे, असे संजय शिरसाट म्हणाले.

# आमदार देवराव भोंगळे यांच्या प्रयत्नांना यश

## टंचाईग्रस्त गावांना ५३ हातपंप मंजूर!



**राजुरा | प्रतिनिधी**

वाढत्या उष्णतेमुळे राज्यातील अनेक भागांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. याच पार्श्वभूमीवर आमदार देवराव भोंगळे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे राजुरा मतदारसंघातील टंचाईग्रस्त गावांमध्ये ५३ नवीन हातपंप (विंधन विहिर) बसवण्यास प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. यामुळे उन्हाळ्यात पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या गोरगरीब नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

उन्हाळा लागला की अनेक गावांना पाणी टंचाईची झळ सोसावी लागते. राजुरा विधानसभेतील अनेक गावांमध्ये पाण्याची पातळी खालावत चालल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होण्याचा धोका होता. अनेक ठिकाणी हातपंप नादुरुस्त होते किंवा पाण्याची पातळी खाली गेल्याने बंद पडले होते. नागरिकांवर पाण्यासाठी भटकंती करण्याची नामुष्की येऊ नये म्हणून या समस्येची गांभीर्याने दखल घेत आमदार देवराव भोंगळे यांनी फेब्रुवारी महिन्यातच विधानसभेतील प्रत्येक तालुक्यात आढावा बैठका घेऊन संबंधित यंत्रणेनी टंचाईग्रस्त गावांची पाहणी करून तेथील गरजेनुसार नवीन हातपंपांसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करावा अशा अधिकाऱ्यांना सूचना केल्या होत्या. तसेच त्यानंतर स्वतः पत्रव्यवहार व पाठपुरावा ही केला. त्यांच्या याच प्रयत्नांना यश आले असून राजुरा विधानसभेतील राजुरा तालुक्यात २० कोरपना तालुक्यात ०९ तर गोंडपिपरी तालुक्यात २४अशा एकुण ५३ हातपंपांच्या मंजुरीचे आदेश प्राप्त झाले आहेत. तसेच येत्या काही दिवसांत जिवती तालुक्यातही टंचाईग्रस्त गावांना नवीन हातपंप मंजूर होणार आहेत. आमदार देवराव भोंगळे यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे ५३ गावांना मिळालेले हे हातपंप पाणीटंचाईवर मात करण्यासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत. लोकप्रतिनिधींनी जनतेच्या समस्यांसाठी सक्रिय राहून पाठपुरावा केल्यास प्रश्न मार्गी लागू शकतात याचे हे उत्तम उदाहरण आहे. त्यासाठी नागरीकांनी त्यांचे आभार मानले आहेत.


# धक्कादायक! तब्बल १५० क्विंटल मका आगीत जळून खाक

## विद्युत स्पार्किंगचा संशय; शेतकऱ्याला अडीच लाखांचा फटका

**वैजापूर | अर्जुन शिंदे**

वैजापूर तालुक्यातील चांडगाव शिवारात गुरुवारी सकाळी घडलेल्या आगीत शेतकऱ्याच्या १५० क्विंटलहून अधिक मका उत्पादनाचे मोठे नुकसान झाले. गट क्रमांक ४८ मधील पुंजाबा दामू वैद्य यांच्या शेतातील ही आग काही मिनिटांत रौद्ररूप धारण करून संपूर्ण मका भस्मसात करून गेली. आगीमुळे तब्बल अडीच लाखांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

ही आग नेमकी कशी लागली याचे कारण अद्याप स्पष्ट नसले, तरी विद्युत तारांमध्ये झालेल्या घर्षणातून स्पार्किंग होऊन आग लागल्याचा संशय व्यक्त होत आहे. कोरड्या हवामानामुळे आगीने झपाट्याने उग्र स्वरूप घेतले आणि ३.५ एकर क्षेत्रातील काढून ठेवलेला मका अक्षरशः जळून खाक झाला. घटनेनंतर महावितरणचे अधिकारी व तहसील प्रशासनाने घटनास्थळी भेट देत पंचनामा केला आहे. या आगीत माझ्या मेहनतीचे सारे काही भस्मसात झाले. इतके नुकसान भरून काढणे माझ्यासारख्या छोट्या



शेतकऱ्याला शक्य नाही. शासनाने तातडीने मदत करावी,अशी विनंती पुंजाबा वैद्य यांनी केली.या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, विद्युत तारा आणि यंत्रणेच्या हलगर्जीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. उन्हाळ्यात स्पार्किंगचे प्रमाण वाढत असल्याने महावितरणने ग्रामीण भागातील वायरिंगची तातडीने तपासणी करावी,अशी मागणी स्थानिक शेतकऱ्यांनी केली आहे.

## प्रसाद दिनकरराव यांची 'दैनिक सह्याद्रीचा राखणदार' करिता बदलापूर तालुका प्रतिनिधीपदी नियुक्ती



**बदलापूर | प्रतिनिधी**

प्रसाद दिनकरराव यांची दैनिक सह्याद्रीचा राखणदारया वृत्तपत्राच्या बदलापूर तालुका प्रतिनिधीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या प्रसंगी संपादक आशिष घुमे व सहसंपादक राहुल मुन यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.पत्रकारिता क्षेत्रात नवे योगदान देण्यासाठी त्यांची ही नियुक्ती महत्त्वपूर्ण ठरणार आहे, असे यावेळी बोलताना सांगण्यात आले.

## महायुतीत मतभेद? शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पडद्यामागे हालचालींना वेग

**मुंबई | विराम पवार**

महायुतीत सध्या सर्व काही सुरळीत नसल्याचे संकेत राजकीय वर्तुळात उमटू लागले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) तर्फे अलीकडेच आजी-माजी मुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात शिवसेना (उद्धव ठाकरे गट) प्रमुख उद्धव ठाकरे यांचे नाव अग्रस्थानी असल्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे अनुपस्थित राहिल्याने अजित पवार नाराज असल्याचे बोलले जात आहे. शिंदे यांनी दिलगिरीचे पत्र पाठवले असले तरी, ते अपुरे ठरल्याचे संकेत मिळत आहेत.विधानसभा निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळाल्यानंतरही, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याविरोधात शिवसेना (शिंदे गट) आक्रमक होत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. नुकत्याच जळगावमधील शरद पवार गटातील नेत्यांनी अजित पवार गटात प्रवेश केला, त्यावरून मंत्री गुलाबराव पाटील यांनी थेट युतीधर्मावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले.समाजकल्याण मंत्री संजय शिरसाठ यांनी देखील आपल्या खात्याचा निधी परस्पर वळवण्यात



आल्याची तक्रार करत अजित पवारांवर निशाणा साधला आहे. तसेच, एसटी महामंडळाला निधी न मिळाल्याने कर्मचाऱ्यांचे वेतन दोन टप्प्यांत देण्याची वेळ आली, यामुळेही परिवहन खात्याबाबत असंतोष व्यक्त करण्यात आला आहे.या सर्व घटनांच्या पार्श्वभूमीवर, महायुतीतील अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर येत असून, युती टिकणार की नाही, असा प्रश्न राजकीय वर्तुळात उपस्थित केला जात आहे.

## राहुल मून यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ (डिजिटल मिडिया) वर्धा जिल्हा अध्यक्ष म्हणून नियुक्ती



**वर्धा | प्रतिनिधी**

दैनिक सह्याद्रीचा राखणदारचे सहसंपादक राहुल मून यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ (डिजिटल मिडिया) वर्धा जिल्हा अध्यक्ष म्हणून आज नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या या महत्त्वपूर्ण नियुक्तीवर, पत्रकार संघाच्या वतीने स्वागत करण्यात आले. या वेळी दैनिक समर्थ गावकरीचे मुख्य संपादक आणि पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे तसेच दैनिक सह्याद्रीचा राखणदारचे संपादक आणि पत्रकार संघाचे नागपूर विभागीय अध्यक्ष आशिष घुमे यांनी राहुल मून यांचे अभिनंदन केले. दोन्ही मान्यवरांनी राहुल मून यांची कार्यक्षमता आणि पत्रकारितेतील योगदान साक्षात करत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.राहुल मून यांची नवीन जबाबदारी निश्चितच वर्धा जिल्ह्यात डिजिटल मीडिया क्षेत्राला नवे वळण देईल, असे यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.


# धरण उशाला...तरीही तहानलेली खरबाची वाडी!

## पन्हळघर धरणाच्या कुशीत आदिवासींचा पाण्यासाठी केविलवाणा संघर्ष

**रायगड | प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील पन्हळघर धरणाच्या काही फुटांवर वसलेली खरबाची आदिवासी वाडी आजही पाण्यासाठी वणवण फिरत आहे. एकीकडे धरणातील पाणी परिसरातील गावांना वितरीत केले जात असतानाच, दुसरीकडे या धरणालगत राहणाऱ्या २५० आदिवासी ग्रामस्थांना हंडाभर पाण्यासाठी जीव तोड मेहनत करावी लागत आहे. कोरड्या पडलेल्या नदीपात्रात खड्डे (स्थानीय भाषेत डवरे) खोदून पाण्याचा थेंब मिळवण्यासाठी त्यांची ही धडपड गेल्या कित्येक वर्षांपासून सुरू आहे. लोणेरेजवळील या वाडीत ८० उंबऱ्यांचे वास्तव्य असून, पावसाळा संपताच टंचाईचा विळखा सुरू होतो. महिलांना लेकराबाळांसह संपूर्ण दिवस पाण्यासाठी फिरावे लागते. वयोवृद्धांनाही सूट नाही. मिळणारे पाणी दूषित असल्याने लहान मुले आजारी पडतात आणि औषधोपचारासाठी पैसा कुठून आणायचा, हा जिव्हाळ्याचा प्रश्न इथल्या प्रत्येक घरासमोर उभा ठाकतो.

या वाडीतून मुंबई-गोवा महामार्ग केवळ पाच किलोमीटरवर आहे. जवळच डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ असून त्याठिकाणी मुबलक पाणीपुरवठा आहे. आजूबाजच्या गावांना नळपाणी योजनेंतर्गत पाणी दिले जाते. परंतु खरबाची वाडी मात्र शासनाच्या योजनांपासून आजही दूर आहे.धरणाचे पाणी समोर दिसते पण पिण्यासाठी एक थेंबही मिळत नाही. धरण उशाला आणि कोरड घशाला ही अवस्था वास्तवात इथे अनुभवायला मिळते. हंडाभर पाण्यासाठी दिवसाचा बराच वेळ जातो. पाणी भरल्यानंतर तो हंडा डोंगर उतरत घरी आणेपर्यंत जीव कासावीस होतो,अशा व्यथा महिलांनी व्यक्त केल्या.रोजीरोटीसाठी काम करण्याऐवजी पाण्यासाठीच दिवस जात असल्याने रोजगाराची समस्या गंभीर बनली आहे. शासकीय पातळीवर आदिवासी विकासासाठी योजना राबवण्याचे दावे वारंवार केले जातात. मात्र या भागातील स्थिती पाहता त्या योजना कागदापुरत्या मर्यादित असल्याचे चित्र उभे राहते.खरबाची वाडीतील या आदिवासी भगिनींच्या आणि बांधवांच्या संघर्षाकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. आम्हाला कुणी वाली आहे की नाही?असा सवाल इथले ग्रामस्थ हताशपणे उपस्थित करत आहेत.



# अखिल कुणबी महासंघाची तालुका कार्यकारिणी घोषित

**भद्रावती | प्रतिनिधी**

स्थानिक शासकीय विश्रामगृहात दिनांक ३ रोज शनिवारला पार पडलेल्या अखिल कुणबी महासंघाच्या तालुकाध्यक्षपदी स्वप्निल मोहितकर, शहर अध्यक्षपदी संदीप गोखरे तर शहरातील लीला ढुमणे यांची महासंघाच्या तालुका महिला संघटक पदी तर महिला शहर अध्यक्ष पदी मोनालीका अतुल कोल्हे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे महासंघाच्या कार्याला तालुक्यात व शहरात गती प्राप्त होईल असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला आहे. सदर सभेला अखिल कुणबी महासंघाचे राज्याध्यक्ष डी. के. आरीकर तथा विदर्भ व जिल्हास्तरावरील पदाधिकारी उपस्थित होते. याशिवाय महासंघाच्या तालुका संघटक पदी योगेश ताजने, तालुका सचिव पदी अमित दौलतकर, तालुका सहसचिव प्रकाश पिंपळकर व शहर संघटक पदी उमेश काकडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी महासंघाचे प्रमिला लेडांगे राज्य उपाध्यक्ष, विद्या चिताडे महिला जिल्हा अध्यक्ष चंद्रपूर, नूतन लेडांगे संपर्कप्रमुख चंद्रपूर यवतमाळ जिल्हा, चंद्रपूर जिल्हा उपाध्यक्ष अतुल कोल्हे, करुणा मोघे, वनिता घुमे, गजानन घुमे तथा सर्व पदाधिकारी व सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.



# श्रेणी २ ची विस्तार अधिकारी पदे केंद्र प्रमुखांमधूनच भरावीत

## पुरोगामी शिक्षक संघटनेची शासनाकडे मागणी

**मुल | प्रतिनिधी**

सन १९६७ पासून रिक्त असलेली शिक्षण विस्तार अधिकारी श्रेणी २ - वर्ग ३ ही पदे कार्यरत केंद्र प्रमुखांमधून पदोन्नतीने भरावी, अशी मागणी महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेने केली आहे. या मागणीसंदर्भात नुकतेच राज्याचे ग्रामविकास सचिव एकनाथ डवले यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी सेवा प्रवेश नियमावलीमध्ये सुधारणा करण्याची प्रक्रिया सुरू आहे व मागणी सकारात्मक विचारात घेतली जाईल, असे आश्वासन डवले यांनी दिले.

वर्तमाण नियमांनुसार, महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ व शासन अधिसूचना दि. १० जून २०१४ नुसार, शिक्षण विस्तार अधिकारी श्रेणी ३ - वर्ग ३ या पदावर ५ वर्षे सेवा पूर्ण केल्यासच श्रेणी २ - वर्ग ३ वर पदोन्नती मिळते. मात्र प्रत्यक्षात, ही पदोन्नती सेवा निवृत्तीस अवघे काही महिने शिल्लक असलेल्या अधिकाऱ्यांना दिली जाते, त्यामुळे ५ वर्षे सेवा पूर्ण होणे अशक्य होते व परिणामी संबंधित पदे कायम रिक्त राहतात.

उदाहरणार्थ, कोल्हापूर जिल्हा परिषदेतील १२ पदे मंजूर असून एकाही अधिकाऱ्याची पदोन्नती आजवर झालेली नाही. ही स्थिती संपूर्ण राज्यभरात आहे. त्यामुळे पर्यवेक्षक यंत्रणेचे सक्षमीकरण होण्यासाठी ६ महिन्यांपेक्षा अधिक काळ केंद्र प्रमुख म्हणून कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांना मूळ सेवाज्येष्ठतेनुसार श्रेणी २ - वर्ग ३ वर पदोन्नती द्यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

या निवेदनावर संघटनेचे राज्याध्यक्ष प्रसाद पाटील, राज्य सरचिटणीस हरिश ससनकर, तसेच केंद्र प्रमुख एन. डी. साळवी, सुभाष केरीपाळे यांची स्वाक्षरी असून, माहिती पुरोगामी शिक्षक संघटनेचे चंद्रपूर जिल्हाध्यक्ष किशोर आनंदवार व जिल्हा सरचिटणीस सुरेश गिलोरकर यांनी दिली.ही मागणी मान्य झाल्यास राज्यातील अनेक पात्र केंद्र प्रमुख अधिकाऱ्यांना पदोन्नतीचा मार्ग मोकळा होईल, अशी आशा शिक्षक व प्रशासकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.

### श्री संत सेनाजी महाराज केश शिल्पी महामंडळातील जाचक अटी अखेर रद्द

# राज्यभरातील नाभिक समाजातील व्यावसायिकांना दिलासा; शासनाचा सकारात्मक निर्णय

**इंदापूर | दत्तात्रय गवळी**

श्री संत सेनाजी महाराज केश शिल्पी महामंडळामार्फत दिल्या जाणाऱ्या विविध योजनांतील अडथळा ठरत असलेल्या जाचक अटी अखेर शासनाने रद्द केल्या आहेत. या निर्णयामुळे राज्यभरातील नाभिक समाजातील शेकडो केश शिल्प व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.या निर्णयामागे महाराष्ट्र नाभिक महामंडळ, बीड जिल्हा शाखेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचा मोलाचा वाटा आहे. गेल्या वर्षभरात महामंडळाचे व्यवस्थापक, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे वेळोवेळी निवेदने देण्यात आली होती. तसेच जेष्ठ नेते बंडू राऊत यांच्या पुढाकाराने नागपूरचे आमदार दटके यांनी विधानसभेत हा मुद्दा उपस्थित करत शासनाचे लक्ष वेधले होते. या अटींमुळे कर्ज, अनुदान व प्रशिक्षण योजनांचा लाभ घेण्यात अनेकांना अडथळे येत होते. बीड आणि अहिल्यानगर येथेही शेकडो प्रकरणे मंजूर असून, अटींमुळे त्याची अंमलबजावणी रखडली होती. केवळ अहिल्यानगरमध्येच १७५ प्रकरणे मंजूर होती.शासनाने या मागणीकडे सकारात्मक दृष्टिकोन ठेवून काही महत्त्वाच्या अटी सध्या शिथिल केल्या आहेत. यामुळे लाभार्थ्यांसाठी योजना अधिक सुलभ बनणार असून, भविष्यात अधिकाधिक व्यावसायिकांपर्यंत या योजना पोहोचतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.या यशस्वी पाठपुराव्यासाठी महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे अध्यक्ष कल्याणराव दळे, प्रदेशाध्यक्ष सयाजी झुंजार, माजी अध्यक्ष दत्ताजी अनारसे, रमेश राऊत, बंडू राऊत, रामदास पवार, दिलीप अनर्थे, विष्णू वखरे, विकास मदने, शांताराम राऊत, विशाल वाघमारे, दादासाहेब काळे आणि सर्व कार्यकर्त्यांचे योगदान महत्त्वाचे ठरले.

### भद्रावती येथे पर्यावरण संवर्धन व विकास समिती गठीत

# तालुका अध्यक्षपदी अमोल दौलतकर महिला तालुका अध्यक्षपदी करुणा मोघे

**भद्रावती | प्रतिनिधी**

भद्रावती येथील शासकीय विश्रामगृहात नुकत्याच पार पडलेल्या पर्यावरण संवर्धन व विकास समिती महाराष्ट्र प्रदेशच्या तालुका अध्यक्षपदी अमोल दौलतकर, महिला तालुका अध्यक्षपदी करुणा मोघे, शहराध्यक्ष पदी उमेश काकडे, शहर सचिव पदी योगेश ताजने

यांची नियुक्ती करण्यात आली. सदर नियुक्तीपत्र पर्यावरण संवर्धन व विकास समिती महाराष्ट्र प्रदेशचे अध्यक्ष दलित मित्र तथा आदिवासी सेवक डी. के. आरीकर यांच्याहस्ते देण्यात आले. त्यांच्या या निवडीमुळे भद्रावती तालुका व शहरातील पर्यावरण चळवळीला गती प्राप्त होईल असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला. सदर सभेला पर्यावरण संवर्धन व विकास समिती महाराष्ट्र प्रदेश राज्याध्यक्ष डी. के. आरिकर तथा विदर्भ व जिल्हास्तरावरील पदाधिकारी उपस्थित होते. याशिवाय तालुका संघटक पदी प्रकाश पिंपळकर, तालुका सचिव पदी स्वप्नील मोहितकर, शहर संघटक पदी संदीप गोखरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी प्रमिला लेडांगे राज्य उपाध्यक्ष, विद्या चिताडे महिला जिल्हा अध्यक्ष चंद्रपूर, नूतन लेडांगे संपर्कप्रमुख चंद्रपूर यवतमाळ जिल्हा, चंद्रपूर जिल्हा उपाध्यक्ष अतुल कोल्हे, मनोज मंदे वरोरा विधानसभा संघटक, लीला ढुमणे, मोनालीका कोल्हे, वनिता घुमे, गजानन घुमे तथा सर्व पदाधिकारी व सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मनसर ग्रामपंचायतीचा कारभार अस्वस्थ करणारा: नागरिकांची प्रशासनाकडे तक्रार

**मनसर | प्रतिनिधी**

रामटेक तालुक्यातील मनसर ग्रामपंचायत कार्यालयाच्या अनियंत्रित आणि लहरी कारभारामुळे स्थानिक नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. ग्रामपंचायतीचे कामकाज नियमितपणे न चालल्याने ग्रामस्थांमध्ये असंतोष पसरलेला आहे. कार्यालयाच्या वेळा निश्चित नसल्यामुळे अनेक वेळा नागरिकांना आवश्यक त्या कामासाठी कार्यालयाला भेट देणे कठीण जाते.

मनसर ग्रामपंचायतीच्या कार्यरत कर्मचाऱ्यांबद्दल आणि सरपंचाबद्दल स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी आहे. कार्यालयाच्या वेळेचा नियमितपणा नसल्याने, ते साधारणपणे दुपारनंतर उघडले जाते, आणि शनिवारच्या दिवशी कार्यालय बंद असते. त्यामुळे इतर गावांमध्ये जिथे ग्रामपंचायतीचे कार्यालय नियमितपणे उघडते, तिथे मनसर ग्रामपंचायतीचे कार्यालय बंद असणे ग्रामस्थांसाठी मोठा त्रास होतो.

यात आणखी एक समस्या म्हणजे, जर कोणाला अत्यावश्यक कागदपत्रांची आवश्यकता असले, तर त्यांना अप्रिय वर्तणुकीला सामोरे जावे लागते. कार्यालयातील कर्मचारी मंगळूर भाषेत बोलताना, त्यांच्या जवळ असलेल्या लोकांना त्वरित आवश्यक कागदपत्रे दिली जातात, मात्र अन्य नागरिकांना टाळाटाळ केली जाते. या बाबी प्रशासनाच्या लक्षात आणून दिल्यानंतरही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.नागरिकांची मागणी आहे की, शासनाने या प्रकरणावर त्वरित लक्ष देऊन आवश्यक त्या सुधारणा केल्या पाहिजेत. तसेच, ग्रामपंचायतीतील कार्यरत कर्मचार्यांवर व प्रशासनावर नियंत्रण ठेवून, नागरिकांना त्यांच्या हक्काचे व वेळेवर सेवाएं मिळवून दिली जावीत.

# तेलकामठी तिष्टी येथे श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन, संतांचा संदेश जीवनात समाविष्ट करण्याचे महत्त्व-रामराव महाराज ढोक

**तेलकामठी तिष्टी | प्रतिनिधी**

शंकरराव पाटील निंबाळकर व नामदेव पाटील निंबाळकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन टिस्टीतील तेलकामठी गावात करण्यात आले.या सोहळ्यात विदर्भ रत्न रामराव महाराज ढोक यांचे कीर्तन व प्रवचन झाले. महाराज ढोक यांनी आपल्या प्रवचनात सांगितले की, संतांचे पाय ज्या गावात पडतात, ते गाव संकटमुक्त होते. तसेच, त्यांनी पुढे सांगितले की, संतांच्या सहवासात राहणे आणि त्यांच्या सांगण्यानुसार जीवन जगणे, हेच खरी मुक्ती प्राप्त करण्याचे मार्ग आहेत.



कार्यक्रमाच्या समारोपासाठी ह.भ.प. सोपान महाराज काळबांडे यांनी कीर्तन केले. त्यांचा समारोपाने संतांचे संदेश मांडला आणि उपस्थितांना आशीर्वाद दिले.या कार्यक्रमात प्रमुख मान्यवर म्हणून ह.भ.प. ईश्वर महाराज उईके, ह.भ.प. देविदास महाराज ढवळे, मृदंग वादक प्रशांत महाराज गायकवाड, हार्मोनियम वादक विनायकराव नागमोते, रवींद्र महाराज कडू, रंजन भुजाडे, ईश्वर कुंबरे, प्रवीण निंबुरकर, प्रदीप तावडे, दीपक डेहनकर, श्रावण करोती, सतिश वानखेडे, सूर्यभान दुर्वे, अभय चिंचुरकर, संस्कार निंबुळकर आणि हर्षल मांडवगडे हे उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन निंबाळकर कुटुंबियांच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांसाठी महाभोजनाचा आयोजन करण्यात आले, ज्यामुळे सर्व उपस्थितांना आनंद व समाधान मिळाले. या सोहळ्यात संतांच्या उपदेशांनी उपस्थितांच्या जीवनात नवा प्रकाश आणला.

# कुंभारवळणमधील महिला मृत्यूमुळे विमानतळ प्रकल्पविरोधातील आंदोलन पेटले,पोलिसांवर हल्ला-तणावात भावनांचा स्फोट

**पुणे | रमेश बनसोडे**

पुरंदर तालुक्यातील आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी सुरू करण्यात आलेल्या ड्रोन सर्व्हेच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारपासून (दि. २) तापलेल्या शेतकऱ्यांच्या आंदोलनाने शनिवारी (दि. ३) हिंसक वळण घेतले. कुंभारवळण गावातील एका महिलेला मृत्यू आल्याच्या पार्श्वभूमीवर संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी पोलिसांवर दगडफेक केली. यात ४ अधिकारी व २० पोलीस अंमलदार जखमी झाले असून दोन शासकीय वाहने फोडण्यात आली. सहा आंदोलकांना अटक करण्यात आली असून इतर आरोपींचा शोध सुरू आहे.कुंभारवळण गावातील एक महिला गेल्या पंधरा दिवसांपासून आजारी होती. शनिवारी तिचा मृत्यू झाल्याने गावात हळहळ व्यक्त होत होती. या दुःखद घटनेच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी गाव सोडण्याचा प्रयत्न केला असता, काही आंदोलनकर्त्यांनी बैलगाड्या पोलिसांच्या गाड्यांसमोर लावल्या आणि अचानक दगडफेक सुरु झाली. या क्षणांना भावनांचा उद्रेक झाला आणि आंदोलकांचे संयम सुटले.

**या घटनेवर प्रतिक्रिया देताना खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या, कुंभारवळण येथे घडलेली घटना अत्यंत दुःखद आणि अस्वस्थ करणारी आहे. शासनाने संवेदनशीलतेने पावले उचलायला हवी होती. आम्ही या घटनेचा तीव्र निषेध करतो.**




पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी सांगितले की, संबंधित महिलेचा मृत्यू आंदोलनाशी थेट संबंधित नाही. ती आंदोलनात सहभागी नव्हती. मात्र तिच्या निधनाची बातमी गावात भावनिक धक्का देऊन गेली आणि त्यामुळे परिस्थिती बिघडली.ज्या प्रकारे बैलगाड्या पोलिसांवर सोडण्यात आल्या, त्यात काही गावकऱ्यांच्या अंगावर गाड्या गेल्या आणि तीन महिला जखमी झाल्या. या सर्व प्रकाराचे व्हिडिओ रेकॉर्डिंग प्रशासनाकडे उपलब्ध असून, त्याच्या आधारे पुढील कारवाई केली जात आहे

घटनास्थळी महसूल व पोलीस अधिकारी उपस्थित होते. मात्र, महिलेच्या निधनानंतरही गावकऱ्यांना तातडीने कोणतेही स्पष्ट आश्वासन न दिल्याने संतापाचा भडका उडाला. गावकऱ्यांचा आरोप आहे की प्रशासनाने हा सर्व्हे स्थगित करण्याची किंवा पुढे ढकलण्याची घोषणा केली असती, तर अशा प्रकारचा संघर्ष टाळता आला असता.

**“ उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले की, विमानतळ प्रकल्प आवश्यक आहे, पण शेतकऱ्यांना त्रास न होता त्यांचा विश्वास संपादन करूनच पुढे जावे.शनिवारीचा ड्रोन सर्व्हे रद्द करण्यात आला आहे. गावकऱ्यांमध्ये अजूनही तणाव आहे. पोलिसांनी काही आंदोलकांना ताब्यात घेतले असून अन्य आरोपींचा शोध सुरू आहे. दरम्यान, गावकऱ्यांनी पोलिसांवर अटक करण्यात आलेल्यांना सोडण्याची मागणी करत सासवड पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन सुरू ठेवले आहे.ही केवळ आंदोलनाची बातमी नाही, ही असंख्य शेतकऱ्यांच्या घराच्या जमिनीतील मातीशी असलेली भावनिक नाळ तुटण्याची वेदना आहे. शासनाने या नाजूक भावनांचा आदर करून पुढील वाटचाल करावी, हीच अपेक्षा.**

# महाराष्ट्र दिनाच्या पावन पर्वावर जि.प.उच्च प्राथमिक शाळा,मुरदगांव (बेलसरे) च्या शिरपेचात मानाचा तुरा

**देवळी । प्रतिनिधी**

वर्धा जिल्हा क्रीडा संकुलात महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने पार पडलेल्या भव्य कार्यक्रमात जि. प. उच्च प्राथमिक शाळा, मुरदगांव (बे.) येथील इयत्ता चौथीचे विद्यार्थी - नयन विजय मोहर्ले, आयुष राजू प्रजापती, आणि प्रणव सुनील खंडाळकर - यांनी रामटेक येथे पार पडलेल्या कब-बुलबुल चतुर्थ चरण परीक्षा आणि गोल्डन ऍरो (राष्ट्रीय स्तर) परीक्षेत घवघवीत यश संपादन करून शाळेचे नाव उज्ज्वल केले.या विद्यार्थ्यांचा जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते राष्ट्रीय सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. या गौरवप्रसंगी जिल्हाधिकारी श्रीमती वामंथी सी., जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहमान, शिक्षणाधिकारी नितुताई गावंडे, वर्धा जिल्हा स्काऊट-गाईड विभागाचे अधिकारी तसेच शाळेचे मुख्याध्यापक, कब मास्टर आणि आदर्श शिक्षक याकूब शेख प्रमुख उपस्थित होते.

या यशानंतर देवळी पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी राजेश रेवतकर,शिक्षण विस्तार अधिकारी हिरामण मून, प्रभारी केंद्रप्रमुख गौतम पाटील, विषयतज्ज्ञ विनोद धोबे, आदमने, अर्चना शिदोडकर, शा. व्य. समिती अध्यक्ष अवधूतजी पचारे, माजी ग्रामपंचायत सदस्य प्रज्वल भिलकर, गजाननराव तालन, पोलीस पाटील पल्लवी भिलकर आणि अनेक पालक, अंगणवाडी सेविका, शिक्षकवर्ग व ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# सेंट जॉन हायस्कूल, पुलगाव येथे समर कॅम्पचा आनंददायी समारोप!

**पुलगाव । प्रतिनिधी**

यशबोध ज्ञान प्रबोधिनी संचालित सेंट जॉन हायस्कूल, पुलगाव येथे दिनांक २९ एप्रिल रोजी १५ दिवस चाललेल्या समर कॅम्पचा समारोप उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला शाळेचे प्रबंध संचालक चंद्रशेखर इंगळे,प्राचार्य संतोष यादव,उपप्राचार्य महेंद्र भोयर, शिक्षक-शिक्षिका, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




या समर कॅम्पमध्ये विद्यार्थ्यांनी प्रार्थना, विविध कला, क्रीडा, बुद्धिबळ, कराटे, झुंबा डान्स, अबॅकस व इतर मनोरंजक खेळांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. समारोपाची सुरुवात सरस्वती वंदनेने झाली.त्यानंतर विद्यार्थ्यांनी 'हीच अमुची प्रार्थना' हे गीत सादर करत उपस्थितांचे मन जिंकले.मास्टर वंश मोकाती याने 'राष्ट्रीय प्राणी' या विषयावर प्रभावी भाषण सादर केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कराटे,झुंबा, आणि विविध प्रात्यक्षिकांनी प्रेक्षकांना आश्चर्यचकित केले.

शाळेच्या अध्यक्षा प्रिती बोरसे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. प्रबंध संचालक, प्राचार्य व उपप्राचार्य यांनी पुढील वर्षीही अधिक संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन नाजिया शेख यांनी तर आभार प्रदर्शन अश्विनी गिरी यांनी केले.शिक्षकवर्ग आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने समारोप सोहळा अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला.

# शेतमजूर महिलांचा महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त सत्कार

**धा. रेल्वे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त कर्मयोगी संत गाडगेबाबा सेवाभावी संस्था, मंगरुळ दस्तगीर व संजीवनी जनसेवा मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने धामणगाव रेल्वे येथील दत्तापूर भागात शेतमजूर महिला कामगारांचा सन्मान करण्यात आला.

पपिताताई कंगाले यांच्या सभागृहात आयोजित या कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष आकाश मुन यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख पाहुणे म्हणून फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीचे नेते व विवेक विचार मंच अमरावती जिल्हा संयोजक प्रशांत मुन, भारती गोडांने व आदित्य रासेकर उपस्थित होते.या कार्यक्रमात शेतकरी, शेतमजूर व कष्टकरी महिला कामगारांचा शाल, श्रीफळ व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.सन्मानित महिलांमध्ये कल्याणी वाणी, सिमाताई सडमाके, उज्वला डुकरे, माधुरी उजवणे, सुमिधा राऊत, माधुरी सावध, लता कळंबे, रेखा मोजे, रत्ना नंधरधणे, प्रतिशा कांबळे, अजंना वानखडे, ऋतिका कंगाले, कांचन सडमाके, सीमा बेले यांचा समावेश होता.या कार्यक्रमाला शेकडो महिला कामगार उपस्थित होत्या व सर्वांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.




# जातीनिहाय जनगणनेच्या ऐतिहासिक निर्णयाचे भाजप नाचणगाव मंडळात जल्लोषात स्वागत!

**नाचणगाव । प्रतिनिधी**

देशाचे यशस्वी आणि दूरदृष्टीचे नेतृत्व करणारे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने घेतलेल्या जातीनिहाय जनगणनेच्या ऐतिहासिक निर्णयाचे संपूर्ण देशभरात स्वागत होत आहे. याच पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी नाचणगाव / इंझाळा / गुंजखेडा मंडळाच्या वतीने नाचणगाव बस स्टॉप येथे जल्लोषात अभिनंदन कार्यक्रम पार पडला.




या कार्यक्रमात कार्यकर्त्यांनी फटाके फोडून, घोषणाबाजी करून आणि मिठाई वाटून केंद्र सरकारच्या निर्णयाचे अभिनंदन केले. या जनगणनेमुळे देशातील सामाजिक व शैक्षणिक आरक्षण धोरण अधिक पारदर्शक, न्याय्य व प्रभावी ठरणार असून, खऱ्या अर्थाने सामाजिक न्यायाच्या दिशेने भारताने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे, असे मत कार्यकर्त्यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमात भाजप नाचणगाव मंडळाचे पदाधिकारी,प्रमुख कार्यकर्ते,युवामोर्चा सदस्य, महिला मोर्चा कार्यकर्त्या तसेच स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांनी केंद्र सरकारच्या या निर्णयाचे स्वागत करत जय नरेंद्र मोदी, सामाजिक न्यायाचा विजय असो अशा घोषणांनी परिसर दणाणून टाकला.

भाजप कार्यकर्त्यांनी या निर्णयामुळे मागास व उपेक्षित घटकांना त्यांच्या हक्काचे स्थान मिळेल, त्यांच्या विकासासाठी अधिक प्रभावी योजना आखता येतील, असा विश्वास व्यक्त केला.या जल्लोष सोहळ्याच्या निमित्ताने भारत सरकार, विशेषतः मा. नरेंद्र मोदी सरकारने सर्वसमावेशक धोरणांचा नवा अध्याय सुरू केला आहे, हे अधोरेखित झाले.कार्यक्रमाचे संयोजन स्थानिक मंडळ पदाधिकाऱ्यांनी उत्तम प्रकारे केले असून, यापुढेही भाजप मंडळ सामाजिक विषयांवर जनजागृती करीत राहणार असल्याचे सांगण्यात आले.

# ग्रामजयंती उत्सव-वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

**पुलगाव । प्रतिनिधी**

दिनांक १ मे २०२५ रोजी नाचणगाव (पुलगाव) येथील शिवाजी कॉलनी, डी. के. लेआउट येथील श्री गुरुदेव प्रार्थना मंदिरात वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ग्राम जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळच्या सत्रात भव्य दिंडी आणि कीर्तनाचा कार्यक्रम पार पडला.

या ग्रामजयंतीचे आयोजन १ एप्रिल ते ३० एप्रिल या कालावधीत करण्यात आले होते. संपूर्ण महिनाभर गावागावात जाऊन कीर्तनाच्या माध्यमातून प्रचार व प्रसार करण्यात आला. राष्ट्रसंतांच्या उपासकांनी हा उपक्रम प्रभावीपणे राबवला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृष्णरावजी वाघाडे यांनी केले, तर कीर्तन सेवा मनोहरराव जावळकर यांनी केली. प्रास्ताविक सुरेशराव मस्के यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. राधाताई चौधरी (गुरुकुंज आश्रम, मोझरी) होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून पुलगावचे ठाणेदार राहुलजी सोनवणे उपस्थित होते.आभार प्रदर्शन हिरामणजी भाजीपाले यांनी केले.



# धुळे स्थानिक गुन्हे शाखेने बीडच्या कुख्यात 'खिडकी गँग'ला केले गजाआड, लाखोंचा मुद्देमाल जप्त



**धुळे । प्रतिनिधी**

धुळे स्थानिक गुन्हे शाखेने बीड जिल्ह्यातील कुख्यात 'खिडकी गँग'च्या मुसक्या आवळल्या असून, त्यांच्याकडून लाखो रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. गँगमधील पाच सदस्यांना अटक करण्यात आली आहे. या आरोपींनी धुळ्यात दोन घरफोड्यांमध्ये सहभाग घेतल्याची कबुली दिली आहे.

पोलिसांनी अटक केलेल्या आरोपींमध्ये शेख अशफाक शेख आसीफ (४६, मोहम्मदीया कॉलनी, बीड), आगामीर खान जहाँगिर खान (४५, मोहम्मदीया कॉलनी, तेलगाव नाका, बीड), फिरोज रहेमा शेख (३६, घोडेगाव, ता. नेवासा), एफाझ शेख अनिस शेख (३६, पिंपळगाव, ता. गेवराई), आणि शेख कलीम शेख अलीम (३३, दहिफळ, ता. बीड) यांचा समावेश आहे. या आरोपींनी देवपुर भागातील लक्ष्मी नगर येथील घरात नोव्हेंबर २०२४ मध्ये घरफोडी केल्याची कबुली दिली. याशिवाय, महिंदळे शिवारातील राजेंद्र नगर येथील घरफोडीमध्येही त्यांनी १२ लाख ७८ हजार ८०५ रुपयांचा ऐवज चोरी केल्याची माहिती दिली आहे.पोलिसांनी आरोपींकडून पाच मोबाईल, दोन हजार रुपयांची रोकड, चार लाख रुपयांचा चोरीस वापरलेला आय ट्रेंटी (एम.एच. १२ एच. झेड. १०६४), तीनशे रुपये किंमतीचे स्क्रू ड्रायव्हर, १० लाख १२ हजार ५२६ रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने आणि देवपूर घरफोडीतील १ लाख २० हजार ५४० रुपये किंमतीचे दागिने जप्त केले आहेत. एकूण सुमारे ४ लाख ३३ हजार ३०० रुपयांचे साहित्य जप्त करण्यात आले.ही मोठी कारवाई धुळे पोलीस अधीक्षक श्रीकांत धीवरे आणि अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली धुळे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार, पोलीस उपनिरीक्षक बाळासाहेब सुर्यवंशी, संजय पाटील, मच्छिंद्र पाटील, संदीप पाटील, हवालदार योगेश चव्हाण, हेमंत बोरसे, प्रल्हाद वाघ आणि कॉन्स्टेबल अमोल जाधव यांच्या पथकाने केली.गुन्हेगारी कारवाईतून 'खिडकी गँग'च्या सदस्यांना अटक करत त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे, ज्यामुळे स्थानिक नागरिकांच्या सुरक्षा आणि विश्वासाला महत्त्वपूर्ण चालना मिळाली आहे.

# मंगला अगडे यांनी पालघर येथील महाराष्ट्र महिला हक्क आरोग्य परिषदेत मांडली दिव्यांगांच्या व्यथा

**तळोधी (बा) । प्रणय बांगरे**

महाराष्ट्र महिला हक्क आरोग्य परिषद पालघर २०२५ ची नववी राज्यस्तरीय परिषद २७ ते २८ एप्रिल दरम्यान पालघर (मुंबई) येथे पार पडली. या परिषदेत चंद्रपूर जिल्ह्यातील तळोधी (बा.) येथील प्रगती दिव्यांग मंचच्या कोषाध्यक्ष मंगला अगडे यांनी अंध, अपंग, दिव्यांग, मुकबधीर आणि अस्थिव्यंग मातांच्या प्रश्नांचा, समस्यांचा आणि अडचणींचा मुद्दा मांडला. दिव्यांगत्वावर मात करत मंगला अगडे यांनी उज्वल यश संपादन केले आहे, ज्याबद्दल त्यांना सर्व स्तरांहून अभिनंदन होत आहे.

मंगला अगडे यांनी दिव्यांग मातांना येणाऱ्या विविध समस्यांविषयी वाचा फोडण्यासाठी आणि शासनाने यावर महत्वपूर्ण पाऊले उचलावीत यासाठी सादरीकरण आणि नेतृत्व केले. आम्ही आमच्या आरोग्यासाठी संस्थाच्या दिव्यांग व्यक्तींच्या विषय समन्वयक संगीता तुमडे आणि प्रगती दिव्यांग मंचचे अध्यक्ष तुलोपचंद गेडाम यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी पालघर येथे दिव्यांग महिलांच्या समस्यांवर प्रकाश टाकला. मंगला अगडे स्वतः दिव्यांग असून दिव्यांग बांधवांसाठी उल्लेखनीय कामगिरी करीत आहेत आणि त्यांना मदत करण्यासाठी सदैव प्रयत्नशील आहेत.



त्यांनी दिव्यांग व्यक्तीच्या विविध समस्यांचे समाधान करण्यासाठी आणि त्याच्या सर्वांगीण विकासासाठी सतत प्रयत्न करण्याचे ठरवले आहे. दिव्यांग व्यक्तीसाठी कर्तव्य म्हणून मंगला अगडे यांनी या क्षेत्रात विशेष लक्ष दिले आहे.या राज्यस्तरीय परिषदेला महाराष्ट्रभरातून ४०० हून अधिक विविध संस्था, संघटना आणि दिव्यांग क्षेत्रातील प्रतिनिधी सहभागी झाले होते.मंगला अगडे यांनी परिषदेत हेही स्पष्ट केले की, मुकबधीर, अस्थिव्यंग दिव्यांग मातेला सर्व आरोग्य सेवा, साधने, सुविधांची व उपचारांची मोफत उपलब्धता होणं आवश्यक आहे. शोषण व पिळवणूक थांबायला हवी आणि मातृत्वाचा अधिकार सर्वांना मिळायला पाहिजे.

त्यांच्या या वक्तव्यामुळे दिव्यांग महिलांच्या आरोग्य, विविध प्रश्न आणि अडचणी सोडवण्यासाठी तसेच त्यांच्यासाठी विकासाच्या क्षेत्रात सतत प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादित केले.

# इरई नदीच्या खोलीकरणाचे काम प्रगतीपथावर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर शहराला ९ कि.मी. समांतर वाहणाऱ्या इरई नदीच्या खोलीकरणाचे काम जिल्हा प्रशासनाच्यावतीने हाती घेण्यात आले आहे. या मोहिमेत शासनाच्या विविध विभागांचा सहभाग असून सामाजिक संघटना, लोकसहभाग आदींच्या माध्यमातून सदर मोहीम ४५ दिवस निरंतर सुरू राहणार आहे. विविध यंत्रसामुग्रीच्या माध्यमातून सद्यस्थितीत नदीच्या खोलीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे.



चंद्रपूर शहर ते इरई - वर्धा नदी संगमापर्यंतच्या १७ कि.मी. लांबीत इरई नदी पात्रातील वाढलेली झाडेझुडपे, गाळ काढून नदी पात्राचे खोलीकरण व रुंदीकरण करण्यात येणार आहे. त्यामुळे नदी पात्राची पूर वहन क्षमता वाढण्यास मदत होईल व शहराला दरवर्षी पडणारा पुराचा वेढा कमी होईल, या उद्देशाने २५ एप्रिल २०२५ रोजी राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांच्या हस्ते इरई नदी खोलीकरण अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. तीन टप्प्यात खोलीकरण करण्यात येणार असून पहिला टप्पा रामसेतू ते चौराळा पुल, दुसरा टप्पा माना टेकडी (लालपेठ कॉलरी) आणि तिसरा टप्पा इरई ते वर्धा नदी संगमापर्यंतचा आहे.पहिल्या टप्प्यात राम सेतू ते चौराळा पुल दरम्यान अम्युझमेंट पार्कजवळ काम सुरू असून आतापर्यंत नदीपात्रातील २०० मीटर जागेतील १४ टीसीएम (अंदाजे ५६०० ब्रास ) गाळ काढण्यात आला आहे. यासाठी ८ पोकलॅन मशीन, १५ हायवा / टिप्पर, ९ टॅक्टर, २ जे.सी.बी. सद्यस्थितीत असले तरी ही यंत्रसामुग्री वाढविण्याचे जिल्हा प्रशासनाचे नियोजन आहे.सदर मोहिमेत जिल्हा परिषद, पोलीस प्रशासन, वन विभाग, चंद्रपूर महानगरपालिका, कृषी विभाग, पाटबंधारे विभाग, भूमि अभिलेख कार्यालय, जिल्हा खनिकर्म, प्रादेशिक परिवहन विभाग, पाटबंधारे विभाग, महाराष्ट्र प्रदुषण महामंडळ ही सर्व शासकीय कार्यालये, सीटीपीएस व डब्ल्युसीएल या खाजगी आस्थापना तर भारतीय जैन संघटना, नाम फाऊंडेशन व टाटा ट्रस्ट या स्वयंसेवी संस्थांचा सहभाग आहे. मोहिमेदरम्यान निघणारा सुपीक गाळ शेतकऱ्यांना निःशुल्क उपलब्ध करून देण्यात येत आहे. मात्र त्यासाठी वाहनाची व्यवस्था शेतकऱ्यांनी स्वत: करायची आहे.

# राजूरमध्ये कावीळ साथ रोखण्यासाठी तातडीच्या उपाययोजना करा-पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

## रुग्णसंख्या २६३ वर; प्रवरा मेडिकल ट्रस्टच्या पथकाची तात्काळ नेमणूक, दूषित पाण्यामुळे गंभीर स्थिती

**अकोले । प्रतिनिधी**
अकोले तालुक्यातील राजूर येथे कावीळच्या साथीने थैमान घातले असून, आतापर्यंत २६३ रुग्णांची नोंद झाली असून दोन मृत्यूंचीही दुर्दैवी घटना घडली आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे जलसंपदा मंत्री व अहमदनगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी रविवार, ४ मे रोजी राजूरमध्ये भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी प्रशासनाला तात्काळ उपाययोजना राबवण्याचे निर्देश दिले.प्रवरा मेडिकल ट्रस्टच्या माध्यमातून विशेष यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असून, रुग्णांच्या रक्तनमुना तपासणीसाठी तातडीने काम सुरू आहे. ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार सुविधा सुरू करण्यात आली असून, डॉक्टरांची टीम २४ तास तैनात ठेवण्यात येणार आहे.
ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामुळे पाणीपुरवठा दूषित झाल्याची तक्रार समोर आल्याने पालकमंत्र्यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश दिले. तसेच जिल्ह्यातील सर्व पाणी स्त्रोतांची तपासणी करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले.
विखे पाटील यांनी ग्रामीण रुग्णालयाला भेट देऊन रुग्ण व नातेवाईकांची भेट घेतली. विशेष उपचार कक्षाची पाहणी करताना त्यांनी मुला-मुलींच्या आहारासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेण्याचे सांगितले. पालकांमध्ये निर्माण झालेल्या भीतीच्या पार्श्वभूमीवर समुपदेशन करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. तलाठी आणि ग्रामसेवक मुख्यालयात अनुपस्थित असल्याच्या तक्रारींवरही पालकमंत्र्यांनी कठोर भूमिका घेतली. साथीचा प्रसार थांबेपर्यंत कोणताही अधिकारी मुख्यालय सोडू नये, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.कोविडसारख्या संकटातील अनुभव लक्षात घेऊन गावातील प्रत्येक कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यासाठी आशा सेविकांची नियुक्ती करण्याचे निर्देशही देण्यात आले. जंतुनाशक औषध व तपासणी यंत्रणा जिल्हा नियोजन व विकास समितीच्या माध्यमातून तातडीने उपलब्ध करून देण्याचे आदेशही त्यांनी दिले.राजूरसह परिसरातील गावांमध्येही सर्वेक्षण करून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचा निर्धार व्यक्त करत पालकमंत्री म्हणाले, हे संकट रोखणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. ग्रामस्थ व प्रशासनाने परस्पर समन्वयाने काम करावे.



# आनंदवन चौकात महिलांसाठी सुलभ शौचालयाची तातडीने व्यवस्था करावी-अल्का योगेश पचारे यांची आमदार देवतळे यांच्याकडे मागणी

**वरोरा । प्रतिनिधी**
वरोरा शहरातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी बाजारपेठ असलेल्या आनंदवन चौकात महिला व मुलींसाठी सुलभ शौचालय उपलब्ध करून देण्यात यावे, अशी मागणी अखिल भारतीय भोई समाज संस्थेच्या (रजि.) महिला विदर्भ अध्यक्ष अल्का योगेश पचारे यांनी आमदार करणभाऊ देवतळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.
या परिसरात अनेक महिला ग्राहक, विक्रेते तसेच शैक्षणिक संस्थांमध्ये शिकणाऱ्या शेकडो विद्यार्थिनींची सतत वर्दळ असते. आनंदवन चौकाला लागूनच आनंदवन कॉलेज, एग्री कॉलेज, डी.एड. बी.एड. कॉलेज, जे.बी. कॉलेज, शिवाजी सायन्स कॉलेज, दिशा कॉलेज, बालाजी आय.टी.आय., सेंट ॲनिस स्कूल व जिल्हा परिषद आनंदवन शाळा अशा अनेक शैक्षणिक संस्था आहेत. त्यामुळे विद्यार्थिनींना व महिलांना अनेक वेळा सार्वजनिक शौचालयाच्या अभावामुळे अडचणींचा सामना करावा लागतो.
विशेषतः मासिक पाळीच्या काळात किंवा प्रवासादरम्यान शौचालयाची निकड भासल्यास महिलांची मोठी गैरसोय होते. या भागात एकही महिला सुलभ शौचालय नसल्याने तातडीने कायमस्वरूपी सुविधा उपलब्ध करून द्यावी, तसेच तोपर्यंत फिरते शौचालय उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.निवेदन देताना अल्का योगेश पचारे यांच्यासोबत सामाजिक कार्यकर्ते अनिल मेश्राम (वरोरा), रिया पचारे, तुलसी आलम (बोर्डा) आदी उपस्थित होते. महिलांच्या आरोग्य व सुरक्षिततेच्या दृष्टीने ही मागणी तातडीने मान्य करून उपाययोजना करण्यात याव्यात, अशी अपेक्षा नागरिकांतून व्यक्त होत आहे.



# घुग्घुसमध्ये विविध क्षेत्रातील कामगारांचा आई फाउंडेशनतर्फे सत्कार

**घुग्घुस । प्रतिनिधी**
महाराष्ट्र दिन तसेच कामगार दिनानिमित्त आई फाउंडेशन बहुउद्देशीय संस्था, घुग्घुसच्या वतीने विविध क्षेत्रात कष्ट करणाऱ्या कामगारांचा सन्मान करण्यासाठी एका विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात नगरपरिषद सफाई कामगार, महामंडळ व खाजगी बस चालक, ट्रक चालक, ऑटो चालक-मालक, तसेच सेक्युरिटी गार्ड यांचा मिठाई, दुपट्टा व छत्री देऊन सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमावेळी संस्थेचे पदाधिकारी प्रशांत सारोकर, अमोल मांढरे, निलेश मुक्के, शाहरूख, इरफान शेख, निखिल गुरूनुले, गणेश भोंगळे यांनी उपस्थित राहून कामगारांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.सत्य शिव गुरूदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष मधुकर मालेकर, झुमनाकेजी व त्यांचा मित्र परिवार यांची देखील कार्यक्रमास विशेष उपस्थिती लाभली. या उपक्रमामुळे कष्टकरी वर्गाच्या योगदानाला सन्मान मिळाल्याने समाधान व्यक्त करण्यात येत आहे.कामगारच समाजाचा खरा आधार आहेत. त्यांचा सन्मान हेच खरे राष्ट्रनिर्माण आहे, असे मत यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.




# देवाभाऊ राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेची जय्यत तयारी पालकमंत्री पंकज भोयर यांनी केली मैदान पाहणी



**वर्धा । प्रतिनिधी**
कबड्डी असो. विदर्भ संघ, नागपूर व अमेच्युअर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित देवाभाऊ राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा (ज्युनिअर गट - मुले व मुली) येत्या ९ ते १२ मे २०२५ दरम्यान भव्यदिव्य स्वरूपात पार पडणार आहे. ही स्पर्धा विदर्भातील कबड्डी क्षेत्राला नवे बळ देणारी ठरणार असून देशभरातून विविध राज्यातील संघ या स्पर्धेत सहभागी होणार आहेत.
या स्पर्धेतील प्राथमिक सामने रामदासजी तडस विदर्भ केसरी स्टेडियम, देवळी, जि. वर्धा येथे ९, १० व ११ मे रोजी खेळविण्यात येणार आहेत. १२ मे रोजी अंतिम सामना आणि पारितोषिक वितरण सोहळा शहीद भगतसिंग मैदान (सर्कस ग्राउंड), वर्धा येथे आयोजित करण्यात आला आहे.
या स्पर्धेच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी आज मैदान पाहणी करण्यात आली. यावेळी राज्याचे पालकमंत्री मा. पंकज भोयर यांनी स्वत: मैदानावर भेट देत स्पर्धेच्या आयोजनाबाबत समाधान व्यक्त केले. त्यांनी आयोजकांना आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले.स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजक संघटनेने व्यापक तयारी केली असून, खेळाडूंना उत्तम दर्जाच्या सुविधा देण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. निवास, भोजन, वैद्यकीय सुविधा, सुरक्षा व्यवस्था यासह प्रेक्षकांसाठीही भव्य आयोजन करण्यात येत आहे.या स्पर्धेमुळे विदर्भातील स्थानिक युवा खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळणार असून, स्थानिक पातळीवरही कबड्डी या पारंपरिक खेळाबाबत नव्या उर्जेचा संचार होणार आहे.

# जिल्ह्यातील मंजूर घरकुल लाभार्थ्यांसाठी रेती उपलब्धतेचे नियोजन

## आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक

**चंद्रपूर । प्रतिनिधी**
घरकुल योजनेंतर्गत मंजूर लाभार्थ्यांना आवश्यक रेती उपलब्ध करून देण्यासाठी प्रभावी नियोजनाची आवश्यकता असल्याचे स्पष्ट करत, राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तसेच आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत जिल्ह्यातील घरकुल लाभार्थ्यांना वेळेवर आणि आवश्यक प्रमाणात रेती मिळवण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या.
बैठकीला जिल्हाधिकारी विनय गौडा, उपविभागीय अधिकारी संजय पवार (चंद्रपूर), रवींद्र माने (राजुरा), अजय चरडे (मुल), जिल्हा खनिकर्म अधिकारी, चंद्रपूरचे तहसीलदार विजय पवार, मृदुला मोरे (मुल), रेणुका कोकाटे (बल्लारपूर), रेखा वाणी (पोम्भुर्णा), मनपा अतिरिक्त आयुक्त चंदन



पाटील, मुलचे मुख्याधिकारी संदीप दोडे, बल्लारपूरचे मुख्याधिकारी विशाल वाघ, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता प्रदीप बाराहाते आणि मतदारसंघातील कृषी अधिकारी तसेच गट विकास अधिकारी यांची उपस्थिती होती.आ. मुनगंटीवार यांनी सांगितले की, घरकुलधारकांना वेळेत रेती न मिळाल्यामुळे प्रचंड असंतोष पसरला आहे. मुल तालुक्यातील ५ महसूल मंडळांमध्ये सध्या ८ हजार ब्रास रेती साठा उपलब्ध आहे, तर एकूण २५ हजार ब्रास रेतीची आवश्यकता आहे. पोंभुर्णा तालुक्यात १९,६०० ब्रास रेती साठा आहे, परंतु बल्लारपूरमध्ये मागणी १८,४६५ ब्रास असून, उपलब्धता केवळ २६० ब्रास आहे. जिल्ह्यातील सर्व रेती घाट १० जूननंतर बंद होणार असल्यामुळे, उर्वरित महिन्याच्या कालावधीत योग्य नियोजन करणे अत्यंत आवश्यक आहे.आ. मुनगंटीवार यांनी गट विकास अधिकाऱ्यांना निर्देश दिले की, प्रत्येक मंजूर घरकुलासाठी आवश्यक रेतीची मागणी तहसिलदारांच्या कडे नोंदवावी. नदी, नाले व घाटांची पाहणी करून शक्य तेवढी रेती उपलब्ध करून द्यावी, तसेच कोणत्याही गरीब घरकुल लाभार्थ्यांचे नुकसान होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.पुढील टप्प्यात महसूल मंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या समवेत झूम बैठकीचे आयोजन करण्यात येईल, ज्यामुळे घरकुल लाभार्थ्यांना वेळेत व नियमानुसार रेती मिळवण्याची प्रक्रिया सुकर होईल, अशी अपेक्षा आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

# जनसेवेचा वारसा जपणारे सावंत कुटुंब-आमदार नारायण पाटील

**सोलापूर । प्रतिनिधी**
जनसेवा हीच खरी ईश्वर सेवा मानून काम करणारे कामगार नेते स्वर्गीय सुभाष आण्णा सावंत यांच्या जनसेवेचा वारसा सावंत कुटुंबाने जपण्याचे काम केले असल्याचे मत आमदार नारायण आबा पाटील यांनी व्यक्त केले.हमाल पंचायतचे संस्थापक अध्यक्ष, माजी जिल्हा परिषद सदस्य व आदिनाथ कारखान्याचे माजी संचालक सुभाष आण्णा सावंत यांची ७४ वी जयंती १ मे रोजी 'हमाल भवन' येथे सुभाष आण्णा सावंत यांच्या प्रतिमेचे पूजन आमदार नारायण आबा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले आणि अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम करमाळा तालुका हमाल पंचायतच्या वतीने आयोजित करण्यात आले होते. यामध्ये पांजरपोळ येथील गोशाळेला चारा वाटप करणे, उपजिल्हा कुटीर रुग्णालयात फळे व खाऊ वाटप करणे तसेच नागरिकांसाठी आरोग्य शिबिरात शुगर, बीपी, हिमोग्लोबिन आणि हृदयरोग रुग्णांची ईसीजी करून तपासणी करण्यात आली आणि गरजेनुसार मोफत गोळ्या व औषध देण्यात आले.
यावेळी या आरोग्य शिबिराचे उद्घाटन संचालक डॉ. वसंतराव पुंडे, डॉ. हरिदास केवारे, संचालक राजाभाऊ कदम, डॉ. बाबुराव लावंड, गोपाळ बापू सावंत, दादासाहेब सावंत, चेअरमन प्रभाकर शिंदे, सरपंच अंकुश शिंदे, संचालक विठ्ठल शिंदे, नगरसेवक गोविंद किरवे, चेअरमन मनोज गोडसे, करमाळा तालुका डिजिटल मीडिया पत्रकार संपादक संघटनेचे अध्यक्ष पत्रकार दिनेश मडके सचिव नरेंद्रसिंह ठाकुर, पत्रकार जयंत दळवी, नानासाहेब घोलप, अशोक मुरूमकर यांच्या उपस्थितीत केले.यावेळी जयंती निमित्त पुढे बोलताना आमदार नारायण आबा पाटील म्हणाले की, स्वर्गीय सुभाष आण्णा सावंत हे सर्वसामान्य परिस्थितीमध्ये संघर्षातून तावून सुलाखून तयार झालेले नेतृत्व होते. सर्वसामान्य जनतेला न्याय देण्यासाठी त्यांनी प्रस्थापितांविरुद्ध संघर्ष करून सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून दिला. त्यामुळे जनतेने त्यांना हमाल पंचायतचे संस्थापक अध्यक्ष, आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचे संचालक, जिल्हा परिषद सदस्यपदी काम करण्याची संधी दिली. माझ्या राजकीय जीवनाची सुरुवातही सुभाष आण्णा सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली झाली असून आमचे वडील स्व. गोविंद बापू पाटील यांच्या पासून सावंत कुटुंबाशी जिव्हाळ्याचे नाते आहे. सुभाष आण्णा सावंत यांच्या निधनानंतर सावंत गटाची यशस्वी धुरा सांभाळून त्यांचे बंधू विठ्ठल आप्पा सावंत, भगवान सावंत यांनी त्यांचे काम चालू ठेवून सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देण्याचे काम केले आहे. त्यांची पुढील पिढीही समाजकारणातून राजकारणात यशस्वी वाटचाल करीत आहेत. सुभाष आण्णा यांचे सुपुत्र ड. राहुल सावंत यांनी पंचायत समिती सदस्य, जिल्हा नियोजन समिती सदस्य, हमाल पंचायत अध्यक्ष म्हणून यशस्वी काम केले असून सध्या त्यांची आदिनाथच्या संचालकपदी निवड झाली आहे. पुतणे संजय उर्फ पप्पू सावंत हेही नगरसेवक म्हणून करमाळा शहराची सेवा करत आहेत तर पै. सुनील बापू सावंतही सावंत गटाच्या माध्यमातून समाजसेवेचा वसा जपून सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी कार्यरत आहेत. सर्वसामान्यांच्या सुख दुःखामध्ये सामील होऊन तसेच सर्व जाती धर्मातील लोकांना सोबत घेऊन कौटुंबिक जिव्हाळा जपण्याचे काम करीत आहेत. कर्तृत्व, दातृत्व, नेतृत्व यांचा अनोखा संगम असलेले आजच्या युगामध्ये सावंत कुटुंब हे खऱ्या अर्थाने आदर्श कुटुंब असून ते करीत असलेले काम बघून स्वर्गात सुद्धा आण्णांना आनंद वाटत असेल, असे गौरव उद्गार आमदार नारायण पाटील यांनी काढले.कामगार नेते सुभाष आण्णा सावंत यांच्या ७४ व्या जयंतीनिमित्त आरोग्य शिबिर प्रसंगी सुनिल बापू सावंत, संचालक डॉ. अमोल घाडगे, ॲड बलवंत राऊत, उद्योगपती योगेश गानबोटे, राजू शियाळ, देवा लोंढे, ड. सुहास मोरे, रामकृष्ण माने, अशोकराव ढवळे, डॉ. गादिया, डॉ. अनुप खोसे, डॉ. संकेत सावंत, डॉ. दीपक केवारे व मान्यवर उपस्थित होते.तसेच रुग्णांना फळे व खाऊ वाटप प्रसंगी चेअरमन प्रभाकर शिंदे, पाराजी शिंदे, सरपंच भोजराज सुरवसे, विलास रोडगे, देवीदास फुंदे, संचालक वालचंद रोडगे, सरपंच बाळासाहेब काळे, सुभाष जाधव, सरपंच आजिनाथ भागडे, ड. प्रशांत बागल, छगन शिंदे, सुभाष शिंदे, हरिदास मोरे व मान्यवर उपस्थित होते.तसेच गोशाळेत मुक्या जनावरांना हिरवा चारा वाटप प्रसंगी नगरसेवक संजय सावंत, सरपंच भाऊसाहेब काळे, सरपंच धनंजय शिंदे, हनुमंत काळे महाराज, सचिन काळे, नगरसेवक मनोज राखुंडे, नगरसेवक फारूक जमादार, अल्लाउद्दीन शेख, सरपंच महादेव वायकुळे, भागवत वाघमोडे, सतीश मोटे व मान्यवर उपस्थित होते.तसेच श्री रामाच्या वनवासाला निघालेले वीट येथील श्रीराम भक्त वनवासी यांनी आण्णांना अभिवादन करून भजन, अभंग, भक्तीगीत गाऊन आण्णांच्या प्रती त्यांच्या स्मृतीस उजाळा दिला.अशा विविध सामाजिक उपक्रमाद्वारे स्वर्गीय सुभाष आण्णा सावंत यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी संचालक डॉ. वसंतराव पुंडे, सरपंच निवृत्ती सुरवसे , नगरसेवक ड. नवनाथ राखुंडे, पत्रकार नानासाहेब घोलप, अशोक काळे, भीमराव लोंढे आदींनी मनोगत व्यक्त केले.यावेळी बागल गटाचे नेते दिग्विजय बागल, मार्गदर्शक विलासराव घुमरे , माजी सभापती गहीनीनाथ ननवरे, जिल्हा परिषद माजी सदस्य बिभीषण नाना आवटे, राष्ट्रवादी अध्यक्ष संतोष वारे, माजी संचालक शशिकांत केकाण, मा. संचालक प्रकाश झिंजाडे, मा. सरपंच बिभीषण खरात, सरपंच दौलत वाघमोडे, चेअरमन वंदन नलवडे, ड. नानासाहेब शिंदे, मा. नगराध्यक्ष ज्ञानेश्वर मोरे, वैभव मुरूमकर, संतोष वाळुंजकर, चेअरमन शहाजी शिंगटे, काशिनाथ नलवडे, विलास नलवडे, सरपंच रंजीत मोरे, भगवान भोई, व्यापारी मनोज पितळे, मयूर दोशी, उत्कर्ष गांधी, मयूर देवी, प्रीतम गादिया, विलास जाधव, पत्रकार महेश दादा चिवटे, अशोकराव नरसाळे, नासीर कबीर, राजेश गायकवाड, मुस्तकीन पठाण, सोहल पठाण, आण्णा सुपनवर, सूर्यकांत भाऊ पाटील, शिंगटे , मा. उपसभापती दत्तात्रय अडसूळ, श्रीकांत घोलप, कमलाकर घोलप, महेंद्र शिंदे, तात्या जाधव, चेअरमन चंद्रकांत काळे, बोरगाव चे संजय शिंदे, एच.आर. पाटील, विजय सुपेकर, सचिन गायकवाड, पै. दादा इंदलकर, बापू बेंद्रे, रावसाहेब शिंदे, आबा वारे, गणेश अंधारे, भरत नलवडे, भाऊसाहेब जाधव, अतुल मुरूमकर, अतुल शिंदे, रोहित सोरटे आदी मान्यवर उपस्थित होते.



> एक मे रोजी महाराष्ट्र दिन व कामगार दिन, अगदी योगायोग म्हणजे या कामगार दिनी कामगार नेते स्व. सुभाष आण्णा सावंत यांची जयंती असल्याने याचे औचित्य साधून यावेळी ज्येष्ठ कामगार बबन सुरवसे, पत्रकार जयंत दळवी, नानासाहेब घोलप, अशोकराव मुरूमकर यांच्या हस्ते कामगारांचे झेंडावंदन करण्यात आले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .